## सारांश

## "मराठी कादंबरी वाङ्मयातील लोकसंस्कृती दर्शन"

(बनगरवाडी, फकीरा, चौंडक, भंडारभोग या मराठीतील प्रमुख
चार कादंबऱ्यांच्या अनुरोधाने)

नागर जीवनापासून दूर पारंपरिक पद्धतीने जीवन जगणाऱ्या, निसर्गाला अधिक जवळ असणाऱ्या लोकांची संस्कृती म्हणजेच लोकसंस्कृती होय. आचार-विचार-राहणीमान त्यांचे रूढसंकेत, रीतीरिवाज, सण-उत्सवांना जिवाच्या पलीकडे जपणारी ही संस्कृती असते.

लोकसंस्कृतीचे स्वरूप धार्मिक असल्यामुळे सहाजिकच धार्मिक बाबींना लोकसंस्कृतीत महत्त्वाचे स्थान असते. धार्मिक बाबतीत हे लोक भावनाशील असल्यामुळे धर्माच्या बाबतीत ती जडजोड स्वीकारत नाहीत. लोकसंस्कृतीवर धार्मिक वर्चस्वाचा पगडा असल्यामुळे या लोकांचे रीतीरिवाज किंवा जीवन धर्मापासून सुरू होऊन धर्मातच त्यांचा शेवट होतो. समाज हा अनेक जातींचा बनलेला असल्यामुळे त्यांचेही प्रतिबिंब लोकसंस्कृतीत पडते. ग्रामशासनाने लोकसंस्कृतीचे राजकीय अंग मर्यादित असले तरी आर्थिक दृष्टीने बलुतेदारी व गावगाडयाने ते सिमित झालेले असते. परंतु या दोन्हीवर धार्मिकतेचा पगडा होता व त्यातूनच अनेक देवी-देवता व त्यांच्या उपासनेचे प्रकार नवस-सायास, आचार-विचार, विधी-विधान यांचे वर्चस्व लोकसंस्कृतीत जाणवते. आपल्या जीवनात धर्माला विशिष्ट स्थान असल्यामुळे माणसाच्या जन्मापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंतचे सारे संस्कार धर्मानुसार करण्याची पद्धती या संस्कृतीचे अविभाज्य अंग असते. विविध देवी-देवतांचे सण-उत्सव, यात्रा-जत्रा, विधी-व्रते, खेळ-नृत्य, कुलधर्म-कुलाचार या सर्व बाबीवर धर्माचा विशेष पगडा असतो. देवतांना प्रसन्न करण्यासाठी बळी देणे, यात्रा-जत्रामध्ये एकत्र जमून आपला कुळाचार पार पाडणे यातून लोकसंस्कृतीच्या अंगोपांगाचे दर्शन घडते.

धर्मप्रधानता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय होय. धर्माला लोकसंस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे. धर्माचे मुळ हे लोकसंस्कृतीत असलेले आढळते. शहरी संस्कृतीपासून ही लोकसंस्कृती दूर

असल्याने अकृत्रिमता हे तिचे वैशिष्ट्य होय. जीवनातील स्वाभाविकताच लोकसंस्कृतीतून सहजलीलया प्रकट होते.

लोकसंस्कृती ही परंपरा प्रिय असल्यामुळे तिच्यावर आधुनिक संस्कार, पांडित्यप्रवणता व शास्त्रीय विचार यांचा प्रभाव कमी जाणवतो. परंपरा प्रियतेमुळेच लोकसंस्कृतीत श्रद्धेला महत्त्व असलेले दिसते. भूत-पिशाच्य, करणी-कवटा अशा गोष्टीवर या लोकांचा विश्वास असतो. विविध उपासना, विधी, कुळाचार, खेळ-नृत्य, त्या त्या देवतांचे उपासक करताना दिसतात. उदा. गोंधळी, वाघ्या-मुरळी, जोगती-जोगतीणी, वासुदेव इत्यादीच्या सहयोगातूनच लोकसंस्कृती फुलारली व सामान्य मानसाच्या जीवन जगण्याची ती एक रीतच बनली. आपली संस्कृती जतन करणे हे अशा लोकांना आपला प्राण जपण्यासारखे वाटते.

या पार्श्वभूमीवर मराठी कांदबरी वाङ्‌मयातील लोकसंस्कृती दर्शन घडवणाऱ्या १. बनगरवाडी (१९५५), ले. व्यंकटेश माडगूळकर २. फकिरा (१९५९) ले. अण्णाभाऊ साठे ३. चौंडक (१९८५) ले. राजन गवस ४. भंडारभोग (१९८९) ले. राजन गवस इ. प्रमुख कादंबऱ्याचा प्रस्तुत लघुशोध प्रकल्पात वेध घेण्यात आला आहे.

**बनगरवाडी -** ही कथाकार व्यंकटेश माडगूळकरांची पहिली कादंबरी. ग्रामीण कादंबरीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणूनच या कादंबरीची नोंद होते. निसर्गाश्रित मानव-समूहाचे जीवनदर्शन हा ‘बनगरवाडीचा’ विषय आहे. रूढार्थाने बनगरवाडीला कथानक असे नाहीच. तसेच बनगरवाडीत लेखकाची दृष्टी सरळपणे लोकजीवन अविस्कृत करीते. प्रस्तुत कादंबरीत माणदेशातील उजाळ, निर्जल, निष्पर्ण, सृष्टी आणि फडया निवडुंगासारखे दारिद्र्य येथे संबंध वाडीवर दुष्काळाचे सावट पसरलेले आहे.

बनगरवाडीतील निसर्गवर्णने निसर्गावर अवलंबून असणाऱ्या धनगरांच्या जीवनाचे चढउतार टिपणारे आहेत. यात निसर्ग त्याच्या रंगरूप नाद गंधासह येतो. निसर्गाचे फुलारलेपण, सुगी आणि धनगरी जीवनातील आनंद अन्योन्य आहे. पिकांचा पिकलेपणा धनगरांना, जनावरांना, पक्षांना गोलगरगरीत करतो. सुगी संपते तेव्हा पाखरे पांगतात आणि धनगरही निवांत बसू लागतात. धनगरगडी

नाचतात तेव्हा सारी बनगरवाडी नाचू लागते. अशी ही निसर्गाची लय संपूर्ण कादंबरीभर भरून राहिली आहे.

धनगरांचे महादैवत, सामुदायिक लग्ने, मावल्या आईची यात्रा, देवीचा प्रसाद, अंगात येणे, पांढरीतून वाळीत टाकणे, कारभाऱ्याला झालेला देवीचा, मृत्यूचा दृष्टांत, शिकारी मरतांना हरणासारखा ओरडून मरणे, बाळा धनगराचे पांढरीला शरण जाणे ह्या सर्व बाबींना येथे स्थान आहे.

बनगरवाडी हे एक समूहजीवन जगणारे खेडे आहे. एक तर तो एक गावगाडा आहे आणि त्यातही तेथील माणसांचा व्यवसाय त्यांना समूहजीवन जगायला भाग पाडतो. म्हणूनच गावपांढरीशी वैमनस्य घेऊन एकटा पडलेला बाळा धनगर गावाने आपणास सामावून घ्यावे म्हणून ‘मावल्या आईच्या’ जत्रेत गावापुढे पदर पसरतांना दिसतो. तेथील लोकजीवनात सण, उत्सव, जत्रा इत्यादी परंपरांना स्वाभाविक स्थान आहे.

**फकिरा -** ‘फकिरा’ ही मांग समाजाच्या मनाचे दर्शन घडविणारी कादंबरी. ‘कुत्र्याच्या मौतीने मरण्यापेक्षा दरोडा पाडून जगा’ असा प्रांत साहेबांनी दिलेला शब्दप्रमाण मानून जगायला निघालेला ‘फकिरा’ हा शाश्वत संघर्षाचे प्रतीक म्हणून कादंबरीभर वावरतो. फकिराच्या लहानपणी राणोजी मांगाचे मुंडके जोगणी घेऊन निघालेल्या गावच्या प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणून शिगावचा बापू खोत तोडतो. राधा आपल्या नवऱ्याच्या मृत्यूचा बदला म्हणून फकिराला वाढवते. मांग समाजामध्ये पेटलेलं विद्रोहाचं वारं आपल्या विरूद्ध अन्यायी प्रवृत्ती, इशा, किशा, भाऊ साधू, बळी, मुरारी, इश्वरा, धम्या, शिवा चिंचणीकर, राजुरकर, निळाजी चिराजी घोचीकर ही सारी माणसे घेऊन तलवारी सकट, बापू खोताचा हात धडापासून वेगळा करतो. **‘फकिरा मला मारू नको ! घे ही जोगणी’** असे बापू खोत म्हणतो. परंतु फकिरा ऐकत नाही. उपासमारीच्या तडाख्यात लुटमार करण्यासाठी गेलेला फकिरा बेडसगावच्या देवस्थानचा खजीना सांभाळणारा रघू बामण रक्षण करीत असताना आपल्या बायको-पोरीच्या अब्रुसाठी तडफडतो तेव्हा फकिरा रघुच्या बायकोला सांगतो, **आई! थांब! खजिना नेणार हाय, तुम्हास्नी ओरबडाय मी आलो नाय**. कारण अब्रु खाऊन उपाशी माणसं जगत नसतात. जावा! आपल्या घरात बसा! असा सल्ला देतो आणि आपली माणूसकी प्रकट करतो आणि दारकोंड केलेल्या आपल्या माणसासाठी ब्रिटीशांच्या

स्वाधीन होतो. हा अस्तीत्वाचा विचार अण्णाभाऊंनी आपल्या कादंबऱ्यातून मांडला. यादृष्टीने 'फकिरा' ही त्यांची श्रेष्ठ कादंबरी ठरते.

अण्णाभाऊंचे साहित्य जसे जीवनसंघर्षातून अवतिर्ण होते तसेच ते स्वयंप्रेरणेतून आविस्कृत होते. विदग्ध वाङ्मय आणि औपचारिक शिक्षणाची प्रेरणा नसतानाही त्यांनी लोकसाहित्य व तमाशा सारख्या लोकाविष्काराची परंपरा समृद्ध केली. 'फकिरा' ही कादंबरी लोकप्रिय ठरण्याचे कारण असे सांगता येईल - लोकमाणसातील इतिहासाला साहित्याचे रूप देणारी ही कादंबरी मानावी लागेल. इंग्रजी अमदानीत फकिराने वारणेच्या खोऱ्यात जी बंडखोरी केली, राणोजीने गावासाठी कटून मरण्याचा जो चित्तथरारक पराक्रम केला, त्याची दखल इतिहासाने जरी घेतली नसली तरी लोकमाणसाने या पराक्रमी पुरूषास ह्दयसिंहासनी बसविले आणि त्याच्या पराक्रमाच्या लोककथा बनविल्या. पराक्रमपूजा हा लोकमाणसाचा स्वभावच असतो. आपल्या गावात जोगणीची जत्रा भरावी म्हणून राणोजीने केलेल्या धाडसामुळे तो देवत्वाप्रत जातो. जागृत वीर दैवत बनतो. बापू खोताचा हात तलवारीसकट कलम करणारा फकिरा आणि आया-बहिणींची अब्रू वाचविण्यासाठी वाघासारखा धावून जाणारा सत्याबा हे लोककथांचे विषय बनले. ग्रामीण भागातील हे लोकमानस या कादंबरीच्या आशयाचा कणा आहे.

वाटेगाव, शिगाव ही पारंपरिक जीवन जगणारी खेडी आहेत. पंच किंवा गावकीपेक्षा येथे कोणीही मोठा नाही. पांढरीशी बेईमान होणाऱ्याला गावात प्रतिष्ठा नाही. पाटील आणि कुलकर्णी यांच्या शब्दाबाहेर जाणे येथे गावकीच्या बाहेर जाणे ठरते. म्हणूनच राणोजी कटून मरतो. सावळा गाव सोडून जातो. बंडू खोत पंचाचा निकाल म्हणून राणोजीचे शिर आणि जोगणी परत करतो. **'काहीही करून तुम्ही जगले पाहिजे'** असा पंताचा आदेश मिळतो. त्याचवेळी फकिरा माळेवाडीच्या मठाकडे धान्याची लूट करण्यासाठी निघतो त्यामुळेच दरोडेखोर ठरलेला फकिरा भावकीच्या आश्रयाने जगू शकला असता, परंतु रावसाहेब पाटलाच्या मुस्काटात देवून तो गावचा रोष ओढवून घेतो आणि येथेच त्याचा गावाचा आश्रय तुटतो. फकिरा परागंदा होतो. फकिरा, राणोजी, सावळा, शंकरराव पाटील, विष्णुपंत कुलकर्णी, बंडुखोत या जुन्या पिढीतल्या पिळदार आणि करारी व्यक्तीरेखा आहेत. जगण्याच्या त्यांच्या कल्पना स्वतंत्र आहेत. या व्यक्तीरेखांचा पीळ अण्णाभाऊंनी समर्थपणे चित्रित केला आहे.

**चौंडक -** 'चौंडक' ही राजन गवस यांची देवदासींच्या व्यथा-वेदनांचा वेध घेणारी कादंबरी. राजन गवस यांनी चौंडक मधून देवदासी-जोगतीण स्त्रियांची होणारी होरपळ मांडली असली तरी प्रामुख्याने यात उल्लेख करावा लागेल तो आपल्या समाजातील पुर्वापार चालत आलेल्या प्रथा-परंपराचा म्हणजे लोकसंस्कृतीचा. **'जोगतीण देवाची, मालकी गावाची'** ही आपल्या बोलीतील म्हण जोगतीणं संपूर्ण जीवन सारांश सांगते. देवाच्या नावावर समाजातील राक्षसी वृत्तींनी निर्माण केलेल्या प्रथेच्या बळी ठरलेल्या देवदासी स्त्रिया यांची दुःखाची गाथा म्हणजे 'चौंडक' या कादंबरीतून राजन गवस यांनी आपल्या समाजातील प्रचलित लोकसंस्कृतीच्या उपासकांची, प्रथा, परंपरांची, देव-देवता, विधी-रूढी यांची उकल केली आणि त्यातून निर्माण झालेली समज-अपसमज, श्रद्धा-अंधश्रद्धा यांचे चित्रण केलेले आहे.

लोकसंस्कृतीच्या नावावर आजही आपल्या समाजात श्रद्धेच्या नावावर अंधश्रद्धाच जास्त पसरविली जाते. यातूनच मग विविध प्रथा-परंपरा अव्याहतपणे चालू राहतात. यात प्रामुख्याने बळी जातो तो स्त्रीचा याचेच एक रूप म्हणजे 'देवदासी' होय. देवी यल्लम्माची सेवक म्हणून या विधीचा, परंपरेचा प्रारंभ आपला समाजात अनेक वर्षापूर्वी झालेला आहे. याचा संबंध शेवटी लोकसंस्कृतीशी जोडल्या गेला. परंपरेप्रमाणे विशेषतः खालच्या वर्गात मोडणाऱ्या स्त्री-पुरूष, जोगणी-जोगत्या म्हणून देवीला एखाद्या विशिष्ट घरातील स्त्री-पुरूष जे परंपरेने किंवा नवसरूपाने देवीला हे जोगीण-जोगते अर्पण करतात. आयुष्यभर देवीची सेवा करावी आणि आपले आयुष्य देवीच्या सेवेला वाहून द्यावे. हीच ही देवदासी परंपरा सांगते पण यात प्रामुख्याने बळी जातो तो स्त्रीचा. स्त्री दुःखाचा नेमका वेध राजन गवस यांनी 'चौंडक' मधून 'सुली' या व्यक्तीरेखेच्या माध्यमातून एक ठसठशीत वेदना आपल्यासमोर मांडली आहे.

आपल्या लोकसंस्कृतीचाच एक भाग म्हणून पुर्वापार चालत आलेला भातकुलीचा खेळ 'चौंडक' मध्ये राजन गवस यांनी रेखाटला आहे आणि खेळातूनच सुलीच्या कादंबरीतील प्रवासाला प्रारंभ केला आहे. भातकुलीच्या खेळातले नवरदेव-नवरी पानाच्या पिपान्या, बाजा इत्यादी वाजंत्र, वाद्य हे आपल्या लोकसंस्कृतीच्या खुणा सांगतात. त्यातूच मग घरात येतांना नवरीला नाव घेण्याची प्रथा, तिचा

अस्वस्थपणा, पाहुण्यांची उत्सुकता इ. गोष्टीचा या कादंबरीत विशेष जाणवतो. सुली कोवळया बालपणातील मुलगी आपल्या हसण्या-बागडण्याच्या दिवसात आपले आयुष्य काढते. संध्याकाळी सांजवेळेला उंबरठयात बसल्यामुळे आजीने केलेली दमदाटी, त्या उंबरठयाला लावलेले ईबुत या सर्व गोष्टी सुलीला अनभिज्ञ होत्या. कारण सांजवेळी लोकांची दारिद्री दूर करायला निघालेल्या लक्ष्मीची ती येण्याची वेळ, तिला घरात यायला अडचण नको म्हणून उंबरठा मोकळा हवा, त्यावर ईबुताचे ओढलेले बोटे तिच्या स्वागताची तयारी दर्शवितात. पण हे सर्व सुलीच्या समजण्यापलीकडे जाणाऱ्या बाबी. पण यातुन आपली लोकसंस्कृतीची लक्ष्मीची कृपादृष्टी प्राप्त करण्यासाठी असलेला समज आपल्या भरभराटीचे प्रतीक आहे.

लक्ष्मीच्या पावलानं घरात भरभराट होते, सुख-संपत्ती नांदते अशी आपली समज, पण या सर्व सुखा बरोबर दुःखही चोर पावलाने माणसाच्या आयुष्यात प्रवेशतात. असेच एके सकाळी सुलीच्या म्हणजे बायजा-सुवाना यांच्या दारातील खोपटीत चिरलेला निंबु, त्यावर हळद-कुंकु, टोचलेल्या टांचण्या इत्यादी प्रकार पाहून सुखी संसाराला लागलेलं ग्रहण होतं. त्याच दिवसापासून लपून राहलेली दुःख हळुहळु समोर येत गेली. बालपणीच्या हसण्या-बागडण्याच्या दिवसातच सुलीच्या आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळाली. लहानपणीच्या मौजमस्तीच्या दिवसातील सुलीच्या डोक्यातील केसात निघालेली एक 'बट' तिच्या संपूर्ण आयुष्याला बाटवून टाकण्यासाठीच जणु तयार झाली होती. सुलीचे केस विंचरतांना तिच्या आजीच्या हाताला आलेली कळ, दारात दिसलेले टांचण्या टोचलेले निंबु, घरात आलेले आजारपण या सर्व बाबी एका वेगळयाच घटनेचा सुतोवात करीत होते. गावातीलच एका जाणकाराच्या सांगण्यावरून सुलीचे कुटुंब हिरणी गावी 'आक्कु' जोगतीणीला भेटायला जातात आणि तेथूनच सुलीच्या नव्या आयुष्याला प्रारंभ होते.

**भंडारभोग -** याच देवांच्या रूढी-परंपरांचा आणखी एक बळी म्हणजे जोगत्या होय. देवदासीप्रमाणे जोगते सुद्धा देवाला सोडलेले आढळतात. आजही ग्रामीण भागात हे जोगते दिसून येतात. यांचे जीवनही देवदासीपेक्षा फार भयावह आहे. कारण देवदासी ही झुलंवा लावू शकते किंवा कोणाची तरी रखेली म्हणून राहू शकते. पण जोगत्याचे तसे नाही. देवदासी मेली तर तिच्या प्रेताला खांदा मिळतो, देवाची दासी

म्हणून लोक तिच्या प्रेताला जमतात, बांधाला तिला मूठमाती, अग्नी मिळतो. पण जोगत्याची कहाणी याहून वेगळी आहे. त्याच्या प्रेताला माणूस मिळण कठीणच. त्याचा स्पर्शही इंगळीसारखा. मेल्यावरही त्याच्या प्रेताला कायमच अंधार.

जोगत्या म्हटल तर तोही एक पुरुष. पण या देवाच्या रूढी परंपरेच्या जोखडाखाली दबलेल्या ओझ्याने त्याच पौरुषत्व केव्हा नष्ट होतं हे त्याचं त्यालाही कळत नाही. अशाच एका जोगत्याचं आणि त्याच्या सोबत चौंडक्या व इतर जोगतीणीच एक विश्व म्हणजे 'भंडारभोग' ही राजन गवस यांची कादंबरी होय. राजन गवस यांनी अतिशय ताकदीने हा विषय मांडला आहे. या कादंबरीत एकमेव नायक म्हणजे 'तायाप्पा'. इतर सर्व जोगत्याचं प्रतिनिधित्व करणारा तायाप्पा म्हणजे एक पुरुष आपलं पौरुषत्व गमावतो हाच या कादंबरीचा विषय आहे.

कल्लवा आणि थोरला यांचा मोठा मुलगा तायाप्पा. एकाएकी आजारपणामुळे पार मरायला टेकलेला. गावातील डॉक्टर, वैद्य वगैरे करून झालेले. पण कशाचाही फरक पडत नव्हता. त्यामुळे तायाप्पा पार वाळून गेलेला. हातापायाच्या काड्या झालेला. त्याची आई कल्लव्वा, बाप, काका-काकू, बहिण-भाऊ सर्वच त्याच्या काळजीने अर्धमेली झालेली. एके दिवशी कल्लव्वा गावातील तानू सुतारणीकडे ताय्याप्पासाठी येते. देवाचं वगैरे काही सगूण आहे का हे पहाव म्हणून ती तानू सुतारणीकडे कापूर-उदकाडया घेऊन येते. ताणू सुतारीण गावातील एक जोगतीण देवाला सोडली, तेव्हापासूनच गावातच बस्तान बांधून राहलेली. गावात काही आजार, देवाचं वगैरे असेल तर सगूण पाहून सांगणारी. कल्लव्वा तिच्याकडे येतो. ताणू सुतारीन कौल लावला पण त्यातून काही उत्तर मिळाल नाही. परत पाच वेळा कौल लावल्या गेला मात्र काहीच उत्तर मिळत नव्हते. शेवटी ताणू सुतारीन 'इंचनाळेला' येत्या मंगळवारी जायचं ठरवते. त्यामुळे कल्लव्वा जिवाच्या ओढीन तयार होते. परत घरी आल्यावर कल्लव्वा घरातील मंडळींना येत्या मंगळवारी इंचनाळेला जायचा कार्यक्रम सांगते व जायचे ठरते. ठरलेल्या दिवशी कल्लव्वा, थोरला, ताणू सुतारीण, ताय्याप्पा हे सर्व तुक्या म्होत्याच्या बैलगाडीतून इंचनाळेला निघतात. सोबत देवीला लागणारे पुजेचे साहित्य, पुरणाचा नैवेद्य घेवून जातात.

इंचनाळ एक छोटसं गाव. त्या गावातील शेवनाक्का. ही एक जोगतीण. त्या गावातच शेवन्ताक्काचा मोठा प्रस्थ. दूर-दूरचे लोक देवाचं वगैरे विचारायला तिच्याजवळ यायचे आणि ती आपल्या जोगतीणीच्या - देवी 'यल्लम्मा' च्या रूपात येऊन सर्वांच्या दुःखाचे निवारण करायची. दुपारच्या वेळेला तुका म्होत्या आणि ताय्याप्पा ही सर्व मंडळी इंचनाळला पोहोचतात. तिथे गेल्यावर शेवन्ताक्काच्या घरी पुष्कळ गर्दी. संपुर्ण घर बाया माणसांनी भरलेले. सोबत जोगे व जोगतीनी सुद्धा मदतीला बसायचे. ते पाहून मात्र ताय्यप्पा चक्रावून जातो. तिथे गेल्यावर ताय्यप्पा तो प्रकार पाहून चक्रावून गेला. त्याला तिथे काय चालले ? ते सर्व कोण आहेत ? तिथे काय म्हणून जमले ? हे सर्व त्याच्या विचारापलिकडे होते. शेवटी त्यांची दर्शनाची वेळ आली तेव्हा मात्र ताय्यप्पा गुदमरल्यासारखा झ ाला. शेवन्ताक्काच्या अंगात आलेलं झाडं, ताय्यप्पाच्या अंगावर जाणे, देवीच झाड, भंडारा तुडवणे या सारख्या प्रकारामुळे ताय्यप्पा मात्र बिथरून गेला आणि तेथूनच त्याच्या वेगळया आयुष्याला प्रारंभ झाला. म्हणजे भंडार माखल्या कपाळावरच्या भंडारभोगाची सुरुवात झाली.

शेवन्ताक्कांना सांगितल्याप्रमाणे ताय्याप्पा, कल्लव्वा, थोरला या सर्वांनी चैत्र पुनवेला गडावर जायची तयारी केली. परंतु थोरला मात्र या गोष्टीला तयार नव्हता. कारण एवढा मोठा मुलगा जोगत्या म्हणून सोडणं त्याला हा प्रकार पसंत नव्हता. कारण देवाच्या नावावर पुरुषाचे पौरुषत्व हिरावून घेण्याची ही प्रथा त्याला मान्य नव्हती. परंतु घरच्यांपुढे मात्र त्याला गुपचूप ऐकावं लागलं. तेव्हाच ताय्यापाला 'जोगत्या' हा शब्द पहिल्यांदा ऐकल्यावर 'आपण आणि जोगता?' ताय्याप्पा त्याच्याच विचारात गुंतून गेला. गाडीच्या चाकासारखे त्याचे मन गोल-गोल फिरत होते. चैत्र पुनवेला यल्लम्मा देवीची जत्रा. त्या जत्रेत सर्व जोगते-जोगजीणी आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी तसेच नवे जोगे-जोगतीणी देवीला सोडण्यासाठी. तर काही आपला बोललेला नवस फेडण्यासाठी येतात. ताय्यप्पा आपल्या नव्या जीवनाचा प्रारंभ करण्यासाठी गडावर निघतो. त्या वेळेस **'उद्ऽगंऽऽ आई उदंऽऽ'** असा गजर करीत गावातून गाडया निघाल्यात. गावातील सर्व जोगे-जोगतीणी आपल्या तालात नाचत-गात देवीची स्तुती करीत आसमंत दुमदूमून टाकतात. नव्या जोगे-जोगतीणींची गावाच्या मंदिराजवळ पूजा केली जाते. तशी ताय्यप्पाची पूजा झाली. जमलेल्या लोकांची शंका दूर करण्यासाठी अंगात आलेलं 'झ

ाड', गावातीलच जुन्या म्हाताऱ्या जोगतीणीला दिलेला मान या सर्व गोष्टी ताय्यप्पाच्या नव्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठीच जणू लेखकाने एक शुभ संकेत दिला आहे.

जोगत्या झाल्यावर ताय्यप्पा पार बदलून गेल्यासारखा दिसून येतो. अंगावर पातळ चोळी, केसाचा अंबाडा, गळयात दर्शन कवडयाची माळ या सर्व गोष्टी त्याला बंधनात बांधल्यासारख्या वाटतात. पूर्वी जोगवा मागायला, घरातून बाहेर न पडणारा ताय्यप्पा, शेवन्ताक्का, पारवा, रत्नाक्का, तानाक्का, फुला या जोगिणिंच्या संगतीत शामील झाला. तसेच त्याच्या सोबतच त्याच्या जीवनात म्हादूप्पा, यमन्या, तान्नाप्पा हा जोगत्यांचा मेळा सोबतीला होता. चैत्र पुनवेची जत्रा अंगावर नेसलेला लिंब, गळयात बांधलेला दर्शन आणि अंगावर घातलेली नऊवार व चोळी यांचा तायाप्पाला झालेला पहिला स्पर्श हे सर्व तायाप्पाला नवीन होते. म्हादु जोग्याची व तायाप्पाची झालेली पहिली भेट. म्हादूची नजर, त्याची अंगाला स्पर्श करण्याची पद्धत या सर्व गोष्टी तायाप्पाला किळसवाण्या वाटायला लागल्या. पुढे पुढे तायाप्पा आपल्या नव्या जीवनाच्या शैलीत ढाळत गेला. रोज जोगवा मागणं, जोगे-जोगतीणीच्या मेळयात मिसळणे या सर्व गोष्टी नित्याच्या झाल्या. एवढा नित्याच्या की तायाप्पा आपल्या घरा दाराला परका झ ाला होता. एका नव्या विश्वात रमत चालला होता. हातात परडी घेऊन जोगवा मागणारा तायाप्पा आता हळूहळू जोगत्याच्या रूपात ढाळत चालला होता. शेवन्ताक्का, तानाक्का या जोगतीणी मात्र तायाप्पाला फार जीव लावीत त्यांना ताय्यप्पाबद्दल फार आस्था वाटत होती. जोगता झाल्यावर ताय्यप्पाला झालेला पहिला पौरुषी स्पर्श मात्र त्याच्या जीवनाला एक वेगळ्या वळणावर आणून ठेवतो. त्यानंतर मात्र ताय्यप्पा हळूहळू आपले पौरुषत्व गमावू लागतो. त्याच्यात आता बायकोपणा आल्यावर मात्र शेवन्ताक्काला फार वाईट वाटते. परंतु तत्पुर्वी तायाप्पा आणि रत्नाक्का यांच्यात वाढलेली जवळीक मात्र तायाप्पा व त्याचे कुटूंब तसेच त्याचे 'नवे कुटूंब' (मेला) मात्र या प्रकारामुळे बिथरून जातात. तायाप्पा आणि रत्नाक्का यांच्यात प्रस्थापित झालेले शरीरसंबंध, त्या दोघांची एकमेकांबद्दल असलेली आपुलकी या गोष्टी इतरांना मात्र खटकू लागतात. परंतु हा संबंध जास्त दिवस टिकत नाहीत आणि तायाप्पा मात्र एका नव्या प्रवाहात वाहत जातो.

तायाप्पा आपल्या नव्या मेळयात रमून जातो. गावोगावी पुजेची घेतलेली सुपारी-भंडारा या कार्यक्रमात तायाप्पा व त्याचा मेळा सर्व आनंदाने राहतात. लग्न-कार्य, पुजा-आराधना अशा कार्यक्रमात तायाप्पा मात्र ‘नाच्या’ म्हणून समोर येतो. असच सर्व चालू असतांना तायाप्पाची मोरे मास्तरांशी भेट होते आणि तेथूनच तायाप्पा आणि एकूणच जोग्या समजल्या जाणाऱ्या पुरुषांच्या आयुष्याला एक नवी कलाटणी मिळते. मोरे मास्तर, तायाप्पा व त्याच्या सारख्या इतर जोगे, चौंडक्या लोकांच्या भल्यासाठी झटणारा माणूस. तायाप्पाच्या मदतीने जोग्यांना सरकारद्वारे उतारवयात त्याच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न करतो. पण सर्व काही व्यर्थ जाते. नेमके कुठे काय होते हे कळायला मार्ग नसतो. मग मात्र सर्व जोगे-जोगतीणी तायाप्पावर उलटतात. या सर्व गोष्टीला कारण म्हणून तायाप्पाला दोषी ठरवतात. शेवटी तायाप्पाचा तोल सुटतो. ज्या देवीच्या नावावर आपण जोगे झालो तिलाच तो शिव्याशाप देतो. एका जोग्याचा मृत्यू मात्र तायाप्पाला सर्व घटनांतून बाहेर काढतो. ज्या प्रवाहात आपण वाहत आलो शेवटी तोच प्रवाह म्हणजे तेच जोगे एकमेकांच्या आधाराला शेवटपर्यंत साथ देतात. हे तायाप्पाला कळून चूकते.

जोगता झाल्यावर मरेपर्यंत भंडार भरवल्या कपाळांवरचा भांगच शेवटी त्या जोग्याला माती देतो हेच जणू तायाप्पा या कादंबरीतून सांगत आहे. तायाप्पा सारखे जोगे अजूनही या समाजात आपला भंडारभोग भोगत आहे. तायाप्पा एक मात्र निमित्ता आहे.

**लोकसंस्कृती आणि आधुनिकता :**

आधुनिकतेचा लोकसंस्कृतीवर एकाएकी परीणाम होत नाही कारण लोकसंस्कृती ही मुळातच धर्मप्रधान असल्यामुळे समाजातील प्रत्येक प्रथा, परंपरेला धर्माचा आधार असतो. भावभोळे धार्मिक लोक परंपरेने चालत आलेल्या रूढी, परंपरांना एकाएकी सोडून देत नाहीत. लोकसंस्कृतीत विविध देव-देवता, त्यांच्या उपासना पद्धती, विधी-विधान, कुळाचार, कुलधर्म, सण, व्रते, उत्सव, यात्रा, जत्रा, संस्कारविधी, कौटुंबिक व सामाजिक संबंध याविषयीचे सर्व संकेत यावर धर्मकल्पनेचे प्राबल्य असल्यामुळे अशा यात्रा जत्रातून लोकसंस्कृतीच्या अनेक अंगाचे दर्शन घडते. म्हणूनच आधुनिकतेचा परिणाम लोकसंस्कृतीवर होत नाही.

धार्मिकतेमुळे कधीकधी अपप्रवृत्ती समाजात आढळतात. समाजात होणारे राजकीय, आर्थिक, सामाजिक बदलाचा परिणाम ही लोकसंस्कृतीवर होत नाही. कारण लोकसंस्कृतीचा कल आपले पुर्वीचे रुप जपून ठेवण्याकडे असतो.

प्रत्येक राष्ट्राला स्वतःची अशी सांस्कृतिक ओळख निर्माण होत असते. या सांस्कृतिक वेगळेपणातूनच त्याची सांस्कृतिक अस्मिता निर्माण होत असते. शतकानुशतकापासूनच्या जीवनसरणीतून, धार्मिक विचारातून, धारणातून त्या राष्ट्राचे लोक कसे जगतात, त्यांचे विचार विश्व, श्रद्धाविश्व कोणते आहे यावरून या राष्ट्राचे सांस्कृतिक वेगळेपण दिसून येते.

असाच सांस्कृतिक लोकवारसा लोकसंस्कृती जपत असलेली दिसते. काही परंपरा ह्या अनिष्ट असतात. काही रूढीमुळे समाजात वाईट प्रथा निर्माण होतात त्या बदलविणे अत्यंत गरजेचे असते. समाजातून देवदासी सारखी प्रथा नष्ट करणे हे महत्त्वाचे आहे. कालची देवदासी ही लोकांच्या अंधश्रद्धेने, अंधभक्तीने निर्माण होत होती. परंतु आज मोठया मोठया शहरांची, सधन अरबांची वासना शमविण्यासाठी देवदासी प्रथेचा वापर समाजकंटक करीत आहेत. खेड्यात दलीत वस्तीत देखण्यामुली असल्यावर यल्लम्माचा प्रकोप होवू नये यासाठी ती मुलगी देखील वाहण्याचे पालकांच्या मनावर ठसविले जाते.

आधुनिकतेच्या नावाखाली गरीब कुटुंबाला सहानुभूती, आर्थिक मदत करून भावनिक दृष्टया कब्जात घेतली जाते. मुलीला यल्लम्माला अर्पण केल्यावाचून पर्याय नाही अशी खात्री पटविली जावून या कोवळ्या कळ्यांना बाजाराचा मार्ग दाखविला जातो.

वाहतुकीची साधने, संपर्क माध्यमे, वृत्तपत्रे, टि.व्ही., रेडीयो इत्यादीमुळे अंधविश्वास, श्रद्धा आणि निष्ठा यांच्यावरही परिणाम झाल्याने नाईलाजाने मुले वाहणारी आई-वडील थोडे जागृत झालेले आहेत. काहींनी थोडेफार शिक्षण घेतलेले असून परिस्थितीला तोंड देण्याची इतर समाजिक स्तराकडे पाहण्याचे धैर्य व शक्ती देवदासीमध्ये आलेली असली तरी ती अत्यल्प आहे.

लोकसंस्कृती ही लोकांच्या समज, गैरसमज, श्रद्धा-अंधश्रद्धा, लोकमानस यामधून साकार झालेली असल्यामुळे आधुनिकतेचा फारसा प्रभाव तिच्यावर पडत नाही. लोकसंस्कृतीत समाजमन हे

धार्मिकतेशी निगडीत असल्याने धर्मानुसार चालत आलेले रितीरीवाज हे प्रमाण मानल्या जात असल्याने आधुनिकतेचा परिणाम हळूहळू लोकसंस्कृतीवर पडतो. कोणतीही धार्मिक गोष्ट ही लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने प्रचलित चालीरीती कितीही अनिष्ट असल्यातरी त्या जपून ठेवण्याचा, जतन करण्याचा समाजमनाचा कल असतो. म्हणून कोणतीही प्रथा नष्ट करण्यासाठी कितीतरी काळ जावा लागतो. हळूहळू अशा प्रथा समाजातून नाहीशा होतात. परंतु थोडयाफार का होईना लोकमानस हया रूढी श्रद्धेने जपून ठेवण्यासाठी धडपडत असते.

देवदासी प्रथा कोल्हापूर-महाराष्ट्रात प्रचलित होती. ती नष्ट करण्यासाठी कितीही कायदे केले तरी ती समुळ नष्ट होवू शकली नाही. यामागचे कारण म्हणजे लोकसंस्कृतीवर असलेला धर्माचा पगडा होय. म्हणूनच ब्रिटीश काळात व स्वातंत्र्यानंतरही केलेले कायदे कुचकामी ठरलेले आढळतात. धर्म व संस्कृतीमुळे समाजात चुकीचा व वाईट प्रथा, रूढींना खतपाणी घातले जाते. या परंपरांना नष्ट करण्यासाठी शिक्षण व प्रबोधन महत्त्वाचे आहे. देवदासीची प्रथा ही धार्मिकतेतून उगम पावलेली असल्याने त्याला समाजमान्यता मिळाली. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून प्रबोधन घडून आणल्यास त्यातील अनैतिकता लोकांच्या लक्षात येईल. शरीराला होणारे आजार, मूल जगण्यासाठी ते देवीला वाहणे असे गैरसमजही समाजातून नष्ट झाले पाहिजे.

**देवदासी प्रथेविरूद्ध झालेले कायदे :**

१.१८९३ चा देवदासींनी देवळात नृत्य केलेच पाहिजे अशी सक्ती रद्द करणारा म्हैसूर सरकारचा कायदा.

२.१९०९ च्या नृत्यावर बंदी घालणारा म्हैसूर सरकारचा कायदा.

३.१९१० चा देवदासी विधीला बंदी घालणारा म्हैसूर सरकारचा कायदा.

४. १९२२ चा देवदासी प्रथेचे निर्मूलन करणारा म्हैसूर सरकारचा कायदा.

५. १९३४ चा मुंबई देवदासी संरक्षण आणि देवदासी प्रथेचे निर्मूलन कायदा.

६.१९८३ चा देवदासी प्रथेला बंदी घालणारा आणि कायद्यान्वये शिक्षेची तरतूद असलेला कर्नाटक सरकारचा कायदा.

कायदे होऊन ही देवदासीची प्रथा बंद झाली नाही. त्यामुळे देवदासी करण्याचे प्रकारही चोरून होतात. पुर्वी असे विधि मंदिरात होत तर आज ते छुपेपणाने होतात.

मानवी जीवनात धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक होत असल्याचे विविध सण, उत्सव, धर्माच्या बदलणाऱ्या व न बदलणाऱ्या गोष्टींना स्वीकारणे ही त्यांची मानसिकता असते. ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे. विज्ञान व शिक्षणामुळे थोडी जागृती होत असली तरी धर्माचे निर्धारण हे सामाजिक वास्तवावर होणे गरजेचे आहे.

सामान्य माणूस जसा अंधश्रद्धेच्या विळख्यात गुरफटलेला असतो त्याचप्रमाणे कायदा राबविणारे त्यांच्यातही अंध:श्रद्धा आढळतात. त्यामुळे धार्मिक बाबतीतील कोणत्याही गोष्टीवर निर्बंध लादायचे झाल्यास त्यात काही अडचणी निर्माण होतात. म्हणून कायदे हे कागदोपत्रीच राहतात त्यामुळे **'सौंदत्तीच्या मंदिराच्या आवारातही पोलीस कमरेला पट्टा लावत नाही. पायात बुटही घालत नाही. देवदासींच्या विधीतही हस्तक्षेप करीत नाही. कारण त्यांच्यातही अंधश्रद्धा आढळते की, देवीच्या विरोधात गेल्यास ती पुरुषालाही लुगड नेसवते.'** त्यामुळे कायदे कागदाचीच शोभा वाढवत राहिले. '२३ जानेवारी १९३१ ला म्हापसे भागात शिरगाव येथे कायद्याची अंमलबजावणी झालेली आढळते. या गावात देवदासी विधी केल्याबद्दल न्यायमुर्ती कालौस रेनाटो गोन्सल्विस यांनी आजो देवळी उर्फ नारायण देवळी, नारायण वामन बसवे, सत्यभामा लाडली व मुक्ता यांना चार महिने दररोज दोन रूपये तर येसू भाविणीला तीन महीने दररोज दोन रूपये दंड भरण्याची शिक्षा दिली होती.'

औरंगजेबानेही आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात बदर बख्त या आपल्या नातवाला लिहिलेल्या पत्रावरूनही असे दिसते की त्यानेही दख्खनचा सुभेदार असतांना औरंगजेबाच्या दक्षिणेत असलेल्या सातारा या खेडयातील खंडेरायाचे देऊळ होते त्याला मुरळ्या वाहिल्या जात ते पाडून टाकले होते.

महाराष्ट्रातही ही प्रथा नष्ट करण्याचे प्रयत्न कर्मवीर शिंदे यांनी केले. त्यांनी या प्रथेविरूद्ध जनमानसात प्रचार करून 'पश्चिम हिंदुस्थानातील मुलींचे रक्षण करणारे संस्थेची' स्थापना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही मुबईत १६ जून १९३६ रोजी देवदासींची सभा घेतली. देवदासींची ही सभा महार परिषदेपेक्षा कितीतरी महत्त्वाची असलेली स्वतः त्यांनीच नमूद केले होते. 'धर्माच्या नावाखाली अनैतिक रितीने विवाह करणाऱ्या, स्वाभिमान लुप्त झालेल्या व देहविक्रय करून पोट भरणाऱ्या स्त्रियांना जगात काय चालले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी' असे आवाहन त्यांनी केले होते.

डॉ. रा. गो. भांडारकरांनीही या प्रथेविरूद्ध जोरदार प्रचार केला. डॉ. बाबा अढाव यांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुले प्रतिष्ठाणने लोकजागृती घडवून आणण्याचे प्रयत्न त्यांनी विविध ठिकाणी देवदासींचे मोर्चे, सभा, सम्मेलने, परिषदा घेऊन लोकजागृती व प्रथेला आळा घालण्याचा प्रयत्न केला.

देवदासी प्रथेमागचे कारण जसे मूल होत नसल्यास किंवा नवस केल्यावरून मूल झाले हे असले तरी मुला-मुलींच्या डोक्यात, केसात जटा होणे हे देखिल आहे. त्यामुळे जटा निर्मूलनाची मोहिमही कोल्हापूर जिल्ह्यात सुरू झाली. गारगोटीचे डॉ. आनंद वास्कर व त्यांच्या पत्नी कीर्तीकुमार आरगडे या सारख्या लोकांनीही या कार्यात महत्वाची भूमिका बजावली. त्याच बरोबर महानगरपालिका, जिल्हा परिषद, शिवाजी विद्यापीठ या सारख्या संस्थानींही या प्रथेच्या उच्चाटणासाठी विशेष प्रयत्न केले.

महाराष्ट्र कर्नाटक या सीमा भागात देवदासी निर्मूलनाची चळवळ रूजली. मुख्यतः निपाणी आणि गडहिंग्लजमध्ये देवीला मुले-मुली वाहण्याचे प्रमाण जास्त असल्याने या भागात प्रा. सुभाष जोशी, प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ. अच्च्युत माने या मंडळींनी देवदासींची सभा-संमेलने घेऊन त्यांचे प्रबोधन करून संघटीत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. निपाणीतील 'सावली' या संस्थेची कामगीरी या दृष्टीने फार महत्त्वाची आहे.

देवदासी प्रथा ही केवळ कायदा किंवा सरकार सोडवू शकत नाही. त्यासाठी कायद्याची योग्य अंतलबजावणी होण महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर समाजप्रबोधनही करण्याची गरज आहे. हल्ली सौंदत्ती येथे मुला-मुलींना लिंब नेसविणे, देवीशी लग्न लावणे अशा प्रथा बंद झाल्यातरी उघडपणे होत नसले तरी चोरवाटांचा आसरा घेऊन असे विधी होतात.

अशाप्रकारे कायद्याने, चळवळीच्या मार्गाने जरी अनिष्ठ रूढींचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न केले गेले तरी समाजाची मानसिकता जोपर्यंत बदलणार नाही, धर्मात जे

चांगले ते घ्यायचे व वाईट काढून टाकून द्यायचे ही समाजाची विचारसरणी दृढ होत नाही तोपर्यंत अशा परंपरा धर्माच्या नावाखाली, अंधश्रद्धेच्या नावाखाली, श्रद्धेचा बुरखा पांघरूण समाजात वावरतच राहतील, असे वाटते.